सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

दूरध्वनी : ०२५३-२२३०५८०, २२३१४७९ फॅक्स :२२३१७१६

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail-nondani@ycmou.digitaluniversity.ac

ज्ञानगंगा घरोघरी

## परीक्षा व नोंदणी विभाग

जा.क्र. : पनिका/२०१६/ दिनांक : २७.०९.२०१६

## शैक्षणिक सत्र २०१६-१७ साठी ऑनलाईन प्रवेश घेतलेल्या मात्र प्रवेशासाठी अपात्र होत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आवाहन

विद्यार्थी मित्रहो,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आपण शैक्षणिक सत्र २०१६-१७ साठी वेगवेगळ्या शिक्षणक्रमांसाठी ऑनलाईन प्रवेश घेतलेला आहे. प्रवेश पात्रता तपासताना अथवा प्रवेश निश्चित करताना काही विद्यार्थ्यांच्या खालील प्रकारच्या त्रुटी राहून गेल्याचे निर्दशनास आलेले आहे.

त्यामुळे **संबंधितांचा प्रवेश कायम करण्यास अडचणी आलेल्या आहेत. तरी संबंधितांनी सदर त्रुटीची पूर्तता तात्काळ करण्यासाठी** nondani@ycmou.digitaluniversity.ac या ई-मेलवर **दिनांक २०.१०.२०१६ पर्यंत करावयाची आहे. अशा विद्यार्थ्यांनी ई-मेल जरी पाठविला असला तरी दिनांक २०.१०.२०१६ पर्यंत कागदपत्रांच्या सत्य प्रतींची पूर्तता तात्काळ करावी अन्यथा यानंतर आलेल्या कोणाच्याही अर्जावर विद्यापीठात कार्यवाही करण्यात येणार नाही याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.**

आपला प्रवेश ऑनलाईनला कायम न झाल्यास त्यास आपण स्वतः जबाबदार असाल, यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जातील कागदपत्रात पात्रतेच्यावेळी खालील प्रकारच्या त्रुटी आढळून आलेल्या होत्या.

१. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक पात्रतेचे दस्तऐवज (पात्रतेचे गुणपत्रक) शैक्षणिक कागदपत्रांच्या ठिकाणी स्कॅन केलेले नाही. त्याऐवजी वेगळेच दस्तऐवज जोडलेले आहे.
२. प्रवेश अर्जावरील नाव व पात्रतेची कागदपत्रे वेगळीच जोडलेली आहेत. आपला फोटो व स्वाक्षरी स्कॅन केलेली नाही. प्रवेश अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे अवाचनीय आहेत. पात्रतेऐवजी वेगळीच कागदपत्रे स्कॅन केलेली आहेत.
३. पात्रतेची कागदपत्रे स्कॅन कॉपी जोडलेली नाहीत.
४. विशेषतः द्वितीय वर्ष बी.ए. च्या माहितीपुस्तिकेतील नियमानुसार आणि विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या शिक्षणक्रमनिहाय प्री-शैक्षणिक पात्रता, शुल्क तक्ता यामधील माहितीनुसार सरळ प्रवेशार्थी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश करताना **बी.ए. व्यतिरिक्त** इतर विद्याशाखेतील पदवीचे प्रथम वर्ष उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र स्कॅन करून प्रवेश केलेला आहे. सदरची पात्रता नसताना प्रवेश झालेला असून तो प्रवेश द्वितीय वर्षास निश्चित करता येणार नाही. त्याऐवजी आपणांस प्रथम वर्षास प्रवेश मिळू शकेल.
५. तसेच द्वितीय वर्ष बी.कॉम. च्या माहितीपुस्तिकेतील नियमानुसार आणि विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या शिक्षणक्रमनिहाय प्री-शैक्षणिक पात्रता, शुल्क तक्ता यामधील माहितीनुसार सरळ प्रवेशार्थी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश करताना **बी.कॉम. व्यतिरिक्त** इतर विद्याशाखेतील पदवीचे प्रथम वर्ष उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र स्कॅन करून प्रवेश केलेला आहे. सदरची पात्रता नसताना प्रवेश झालेला असून तो प्रवेश द्वितीय वर्षास निश्चित करता येणार नाही.
६. कोणत्याही शिक्षणक्रमातील पदविका (उदा. डीएड, डीईई, डीफार्म, डीमई, डीसीई, इत्यादी पदविका प्राप्त विद्यार्थी) **द्वितीय वर्ष बी.ए. अथवा बी.कॉम.साठी सरळ प्रवेशास पात्र होत नाहीत** तरी

देखील प्रवेश ऑनलाईनला घेतल्याचे निर्दशनास आलेले आहेत. ह्याबाबत माहितीपुस्तिकेत माहिती दिलेली आहे. सदरचा प्रवेश **द्वितीय वर्षास निश्चित करता येणार नाही**. त्याऐवजी आपणांस प्रथम वर्षास प्रवेश मिळू शकेल.

७. माहितीपुस्तिकेतील सूचना काळजीपूर्वक न वाचता काही विद्यार्थ्यांनी ज्या शिक्षणक्रमाला अथवा पीआरएननुसार पुढील वर्षाला प्रवेश करावयाचा असताना तो न करता चुकीच्या वर्षाला अथवा शिक्षणक्रमाला प्रवेश केल्याने संबंधिताचा चुकीचा प्रवेश झालेला आहे. (उदा. एमए प्रथम वर्षाला करण्याऐवजी द्वितीय वर्षाला प्रवेश केला आहे. पीआरएन अन्वये फरदर प्रवेश करण्याऐवजी नवीन प्रवेश केला आहे.)

८. ऑनलाईन प्रवेश करताना आपल्या नावात, पत्त्यात, जन्मदिनांक, ई-मेल आयडी, फोटो, स्वाक्षरी इत्यादी फ्रोफाईल दुरूस्तीसाठी देखील खालीलप्रमाणे कागदपत्रे विद्यापीठाकडे पाठवावयाची आहेत.

उपरोक्त मुद्दा क्रमांक ४, ५, ६ साठी चूकून प्रवेश झाला असेल तर त्याऐवजी ज्या शिक्षणक्रमाला व ज्या वर्षाला पात्र असाल अथवा प्रवेश करावयाचा असेल तेथे ऑनलाईन प्रवेश शुल्कासह तात्काळ करावा. त्यानंतर चुकीच्या प्रवेशाची प्रत, नवीन पात्र प्रवेशाची प्रत, विद्यार्थ्याचा विनंती अर्ज करून विद्यापीठाकडे शुल्क परताव्यासाठी खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी उपरोक्त बाबी चुकल्या असतील तर आपणास योग्य प्रवेश व योग्य शिक्षणक्रमाची निवड निश्चित करावयाची असल्यास त्यासाठी विद्यापीठाकडे विनंती अर्ज, ऑनलाईन अर्जाची प्रिंट, रूपये ३००/- प्रक्रिया शुल्क धनाकर्ष **फायनान्स ऑफिसर, यचममुवि, नाशिक** या नावाने काढून सर्व कागदपत्रे विद्यापीठाकडे तात्काळ दिनांक २०.१०.२०१६ पर्यंत **परीक्षा नियंत्रक, यचमम विद्यापीठ, नाशिक ४२२२२२ ह्या पत्त्यावर पाठवावी**. अन्यथा चुकीचा प्रवेश निश्चित होणार नाही व परीक्षेसाठी आपणांस परीक्षा प्रवेश पत्र देखील मिळणार नाही यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.

मागील वर्षापासून परीक्षेच्यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याच्या उत्तरपुस्तिकेवर विद्यार्थ्यांचे नाव, कायमनोंदणी क्रमांक, परीक्षा आसन क्रमांक, फोटो, स्वाक्षरी, अभ्यासक्रमाचे नाव, परीक्षेची वेळ, दिनांक, सत्र सरळ छापण्यात येणार असल्याने विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित असणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय विद्यार्थ्यास परीक्षेस बसता येणार नाही. त्याचप्रमाणे ऐनवेळच्या क्रमांकाने देखील परीक्षा देता येणार नाही. तसेच इतर विद्यार्थी (डमी) संबंधित विद्यार्थ्याच्या जागेवर परीक्षेस बसू शकणार नाही, असे घडल्यास पोलिस कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**वेळेत कार्यवाही पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेश शैक्षणिक सत्र २०१६-१७ साठी अपात्र ठरविण्यात येईल.** याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

आपणाकडून सहकार्याची अपेक्षा ! कळावे.

आपला विश्वासू,

**प्रा.(डॉ.) अर्जुन घाटुळे**
***परीक्षा नियंत्रक***

**प्रत माहितीसाठी - १. मा. कुलगुरू, यचमम विद्यापीठ,नाशिक २. मा. कुलसचिव, यचमम विद्यापीठ,नाशिक**

**अत्यंत महत्वाचे : सर्व अभ्यासकेंद्र संयोजकांना विनंती, आपल्या अभ्यासकेंद्रावर जमा झालेल्या प्रवेश अर्जात उपरोक्त बाबी तपासून घ्याव्यात आणि वरील त्रुटी आढळून आल्यास संबंधित विद्यार्थ्यांच्या निर्देशनास तात्काळ आणून द्याव्यात आणि त्रुटीची दुरूस्ती विहित वेळेत करून घ्यावी अन्यथा संबंधितास परीक्षेस बसता येणार नाही याची कल्पना द्यावी.**